लोकमत



निमगाव येथे द्राक्ष पिकाच्या एप्रिल छाटणीविषयी घेण्यात आलेल्या कार्यशाळेला उपस्थित शेतकरी बांधव.

# द्राक्ष छाटणीवर शेतकऱ्यांनी साधला संवाद

लोकमत न्यूज नेटवर्क

**कुर्डूवाडी** : माढा तालुक्यातील निमगाव (टें) येथील विठ्ठलगंगा फार्मर्स प्रोड्युसर कंपनीच्यावतीने महाराष्ट्र दिनाचे औचित्य साधून द्राक्ष पिकातील एप्रिल छाटणी व्यवस्थापन करण्याच्या दृष्टीने कंपनीतर्फे शेतकरी संवाद कार्यक्रमात राष्ट्रीय द्राक्ष संशोधन केंद्राचे संचालक डॉ. आर. जी. सोमकुंवर व वरिष्ठ शास्त्रज्ञ डॉ. निशांत देशमुख यांनी मार्गदर्शन केले.

अध्यक्षस्थानी माढा वेल्फेअर फाऊंडेशनचे चेअरमन धनराज शिंदे होते. प्रक्षेत्रावर शेतक-यांच्या विविध पिकावरील समस्या सोडविण्याच्या दृष्टीने शेतकरी संवाद हा उपक्रम राबविण्यात आला. याचाच एक भाग म्हणून कार्यशाळा घेण्यात आली. भविष्यात शेतक-यांनी निर्यातक्षम शेतीमाल उत्पादनावर भर देणे आवश्यक आहे. कंपनीद्वारे उभारण्यात आलेल्या अद्ययावत पॅकहाऊसचा फायदा करून घेण्याचे आवाहन धनराज शिंदे यांनी केले.

यावेळी जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी बाळासाहेब शिंदे, मंडळ कृषी अधिकारी संजय पाटील, कंपनीचे व्हाईस चेअरमन श्रीकांत पाटील, संचालक पोपट खापरे, नितीन कापसे, महेश मारकड, महेश डोके, प्रशासकीय अधिकारी राहुल वरपे आदी उपस्थित होते. (वा.प्र.)